**रे.दि.मु.नं.३२६/२०१९**

## निशाणी ३७ खालील आदेश
## (भाऊसाहेब जगताप वगैरे वि. सुभाष खेडेकर वगैरे)

प्रस्तुत अर्ज वादी यांनी मयत वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, सदर दाव्यातील वादी क्र. १ हे मयत झालेले आहेत. त्यांना सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस आहेत. त्यामुळे त्यांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.५ तर्फे म्हणणे देऊन सदरचा अर्ज खोटा, लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य नाही. वादी क्र.१ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, वादी यांनी सदरचा विलंब जाणीवपुर्वक केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींना विनाकारण मानसिक, आर्थिक नुकसान/त्रास होत आहे. तसेच दावा दुरुस्त झालेस प्रतिवादी यांचे कामकाज वाढणार असून त्यांना मानसिक त्रासास सामोरे जावे लागत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चावर मंजुर करावा.

४. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र.१ यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे कायदेशीर वारस आहेत. वादींनी त्याचे कथनाचे पुष्टयर्थ नि.३८ वर शपथपत्र दिले आहे. वादींनी प्रस्तुत दावा ठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी क्र.१ हे आवश्यक पक्षकार होते. सदर वादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांच्या रुपात त्यांचा दावा मिळकतीमध्ये असणारा हक्क व अधिकार

जीवंत राहणार आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी न्यायनिर्णय होणेकामी मयत वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेतील मुळ वाद संपुष्टात येणार नाही व नवीन दावे दाखल होण्याची शक्यता निर्माण होणार आहे. तसेच प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे –

## आदेश

**१.** अर्ज (निशाणी ३७) मंजूर करण्यात येतो.

**२.** वादींना मयत वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

**३.** वादींनी प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसांचे आत अभिलेखावर दाखल करावी.

**सही/–**

**( सौ. एस. के. देशमुख )**

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सासवड.

सासवड.

दिनांक २७/०६/२०२३.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Mrs. S. R. Kamble, |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D. &<br>J.M.F.C.,Saswad |
| (c) | Date of Judgment /Order | : | 27/06/2023 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 27/06/2023 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 12/07/2023 |